गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक ८० वा ● बुधवार ०७ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 80 | Date : 07/08/2024 | blow Wednesday | Page 4 Price 4


## चुकीला माफी नाही, विधानसभेच्या तिकीट वाटपासंदर्भात नाना पटोलेंचं मोठं विधान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई :राज्यात विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांमध्ये जाहीर होईल. त्यामुळे या निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आलेला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरु केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधील पक्षांमध्ये जागावाटपाबाबतही खलबतं सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषद निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत महाविकास आघाडीला धक्का बसला होता.

कारण विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग करत महायुतीच्या उमेदवारांना मतदान केल्याचा आरोप केला जात आहे. आता यावरूनच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीत क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांना इशारा दिला आहे. कोणत्याही बदमाशाला पक्षात स्थान नाही. चुकीला माफी नाही, असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

काँग्रेसच्या हायकमांडकडून आता निर्णय घेण्यात आला आहे की, कोणत्याही बदमाशांना, यापुढे पक्षात स्थान दिलं जाणार नाही. काही लोक फक्त व्यापारासाठी पक्षात येतात. मात्र, याबाबतची स्पष्ट भूमिका काँग्रेस पक्षाने घेतलेली आहे, असं नाना पटोले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.काही दिवसांपूर्वी राज्यात विधानपरिषदेची निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा व्हीप न जुमानता महायुतीच्या उमेदवारांना काँग्रेसच्या काही आमदारांनी मतदान केलं असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत काँग्रेसच्या हायकमांडने प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांकडून अहवाल मागवला होता तर क्रॉस वोटिंग करत महायुतीला मदत करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. यानंतर आता काँग्रेस पक्षाशी दगाबाजी करणाऱ्यांचा आगामी विधानसभेला

। पान २ वर

## शिक्षकांना जुन्या निवृत्तिवेतनासाठी समिती; मुख्यमंत्र्यांची घोषणा; २६,९०० जणांना लाभ होण्याची शक्यता

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्यातील २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी निवृत्तिवेतन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेरपडताळणी करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षक आमदारांचा समावेश असलेल्या समिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका बैठकीत घेतला. विशेष शिक्षक पदनिर्मिती व जुन्या निवृत्तिवेतन योजनेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. राज्यात २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या आणि २०१० पूर्वी १०० टक्के अनुदानावर असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाल्यानंतर समिती स्थापनेबाबत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली.राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सध्या सुमारे २ लाख ४१ हजार अपंग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राज्यात समग्र शिक्षा योजनेंतर्गत २००६ पासून कंत्राटी तत्त्वावर १०२ जिल्हा समन्वयक, गट स्तरावर ८१६ विषयतज्ज्ञ, केंद्र शाळास्तरावर १७७५ असे एकूण २६९३ विशेष शिक्षक तर दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक स्तरावरील ५४ व माध्यमिक स्तरावरील ३५८ मिळून ४१२ असे एकूण ३१०५ विशेष शिक्षक कार्यरत आहेत. बैठकीला शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मंत्री संजय राठोड, संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आशीष जयस्वाल, प्रकाश आबिटकर, किशोर दराडे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल, शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, आयुक्त सूरज मांढरे आदी उपस्थित होते.१५ मार्चच्या निर्णयाप्रमाणे तालुक्याच्या ठिकाणी दोन विशेष शिक्षक मंजूर असून त्याची व्याप्ती वाढवितानाच केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सध्या कार्यरत असणाऱ्या ३१०५ विशेष शिक्षकांना सामावून घेतले जाणार असून गरजेनुसार नवीन भरतीही करण्यात येणार आहे.

## आरोग्य विम्यावरील १८ टक्के जीएसटी मागे घेण्याची विरोधकांची मागणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : आयुर्विमा व आरोग्य विम्यावरील १८ टक्के जीएसटी मागे घेण्याची मागणी करत मंगळवारी 'इंडिया'तील विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसदेच्या आवारात तीव्र निदर्शने केली. यासंदर्भात केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांनीही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र लिहिले होते. विरोधकांनी निदर्शनाद्वारे गडकरींच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. आरोग्य विम्यावर जीएसटी आकारणे हा कर-दहशतवाद आहे, अशी निषेधाची फलके घेऊन विरोधी पक्षनेत्यांनी संसदेच्या मकरद्वारात घोषणाबाजी केली. या निदर्शनामध्ये मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी,





सोनिया गांधी यांच्यासह तृणमूल काँग्रेस, शिवसेना-ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा आदी इंडिया आघाडीतील नेते सहभागी झाले होते. तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील गटनेते सुदीप बंडोपाध्याय यांनी आयुर्विमा व आरोग्य विम्यावरील १८ टक्के जीएसटी वसूल करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय जनतेविरोधी आहे. सामान्य लोकांना याच विम्याचा आधार असून त्यावरही सरकार कर लादणार असेल तर लोकांनी कुठे जायचे, असा प्रश्न बंडोपाध्याय यांनी केला होता. त्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही आयुर्विमा व आरोग्य विम्यावरील जीएसटी हटवण्याची मागणी पत्राद्वारे केली होती.

## लालकृष्ण अडवाणी यांची प्रकृती खालावली, रुग्णालयात केलं दाखल

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना आज सकाळी दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले



आहे. अपोलो हॉस्पिटलच्या न्यूरोलॉजी विभागात त्यांना दाखल करण्यात आलंय. रुग्णालयाने सांगितले की, त्यांची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत. ९६ वर्षीय अडवाणी यांना वया अधिक झाल्याने आरोग्याच्या समस्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना दिल्लीतील एम्समध्ये दाखल करण्यात आले होते.अडवाणी यांना यावर्षीचा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न प्रदान करण्यात आलाय.

प्रकृतीच्या कारणाने ते राष्ट्रपती भवनात उपस्थित राहू शकले नव्हते, त्यामुळे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ३० मार्च रोजी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना भारतरत्न देऊन सन्मानित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनखर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा आणि लालकृष्ण अडवाणी यांचे कुटुंबीय या औपचारिक सोहळ्याला उपस्थित होते.

## माढा मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या मागण्यानुसार आमदार बबनदादा शिंदे शरद पवारांच्या भेटीला





**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर माढा मतदारसंघाचे अजित पवार गटाचे आमदार बबन शिंदे यांनी शरदचंद्रजी पवार यांची भेट घेत सर्वांनाच आश्र्चर्याचा धक्का दिला असल्याची गेल्या दोन वर्षांपूर्वी झालेल्या राष्ट्रवादीच्या पक्षपोटीमध्ये आमदार बबनदादा शिंदे यांनी शरद पवार यांची साथ सोडत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. मात्र लवकरच राज्यातील विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता निर्माण झालेली असतानाच माढा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांची भेट घेऊन नवे संकेत पंढरपूर माढा मतदारसंघातील जनतेला दिले आहेत

## पत्नीला घेऊन नाचल्याने, भावजयीने केला दिराचा खून

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : गावातील लक्ष्मीदेवीच्या उत्सवात वाद्यांच्या तालावर पत्नीला खांद्यावर उचलून घेत नाचल्याचा राग मनात धरून भावजयीने दिराच्या पोटात चाकूने भोसकून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना बार्शी तालुक्यातील नागोबाची वाडी गावात घडली.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यात या गुन्ह्याची नोंद झाली आहे. धनराज हिरा काळे (वय ३०) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याची भावजय आशा ऐजिनाथ काळे (वय ३३) हिला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत धनराजची पत्नी संगीता (वय २७) हिने दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नागोबाची वाडी गावात काळे कुटुंबीय राहण्यास आहे.



गावात दरवर्षीप्रमाणे लक्ष्मीदेवीचा उत्सव साजरा केला जात होता. या उत्सवात शेकडो भाविक सहभागी झाले होते. सायंकाळी साडेसातच्या सुमारास वाद्यांच्या तालात उत्सवाने रंग भरला असताना काही तरुण उत्साहाच्या भरात बेधुंद होऊन नाचत होते. या जल्लोषात धनराज काळे याने आपली पत्नी संगीता हिला खांद्यावर उचलून घेतले आणि तो नाचू लागला. हा प्रकार त्याची भावजय आशा काळे हिला आवडला नाही. तिने देवकार्यातून काढता पाय घेत घर गाठले. काही वेळानंतर धनराजही घरी पोहोचला. या वेळी भावजय आशाने धनराजशी भांडण काढले आणि रागाच्या भरात तिने हातातील चाकूने त्याच्यावर हल्ला केला. यामध्ये तो गंभीर जखमी झाला. त्याच अवस्थेत तो बाहेर पळत आला. त्याने भावजय आशा हिने पोटात चाकूने भोसकल्याचे सांगितले. त्यास तातडीने रुग्णालयात दाखल केले असता मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## १८ वर्षे पूर्ण केलेल्या व मतदार यादीत नाव नसलेल्या प्रत्येकाने मतदार यादीत नाव नोंदणी करावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

*** मतदारांनी फॉर्म नंबर ६ भरून मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करून घ्यावे. * जिल्ह्यात ३५ लाख ७८ हजार ७९२ इतकी मतदारांची संख्या, तर ३७२३ मतदान केंद्रांची संख्या. * लोकसभा २०२४ पेक्षा १२४ मतदान केंद्रे नव्याने वाढली.**




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः प्रारूप मतदार यादी दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यानुसार जिल्ह्यात ३५ लाख ७८ हजार ७९२ इतकी मतदारांची संख्या आहे. तरी ज्यांनी आपल्या वयाचे १८ वर्षे पूर्ण केली आहेत अशा तरुणांनी व ज्यांचे मतदार यादीत अद्याप पर्यंत नाव नोंदवले नाही अशा नागरिकांनी त्वरित आपले नाव मतदार यादीत नोंदवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

निवडणूका पारदर्शक आणि न्याय वातावरणात पार पाडयासाठी मतदार याद्यांचे अद्यावतीकरण, शुध्दीकरण अत्यंत महत्वपुर्ण असते, यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम (दुसरा) राबविला आहे. दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये प्रारूप यादी प्रकाशित करून यंदाच्या विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून हा कार्यक्रम दि.६ ऑगस्ट २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत राबविला जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

दि.१ जुलै २०२४ रोजी किंवा त्याआधी १८ वर्षे पुर्ण केलेल्या नागरिकांना या कालावधीत मतदार नोंदणी करता येणार आहे. २०२४ मध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकामध्ये मताधिकार बजाविणेसाठी ही महत्वाची संधी असलेने पात्र नव मतदारांनी नाव नोंदणी करावी, तसेच ज्या मतदारांची नावे वगळली गेलेली आहेत अथवा ज्यांची नावे मतदार यादी मध्ये नाहीतच अश्या सर्व नागरिकांनी नमुना अर्ज क्र.६ भरून आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करावीत असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. प्रारूप यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खत्री करणे आवश्यक आहे. कारण, बरेचदा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नांव मतदार यादीमध्ये नाही अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. तसेच आपले नाव, पत्ता, लिंग, जन्म दिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इ. तपशिल सुध्दा अचुक आहे का याची खात्री करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांना सदर तपशिलामध्ये दुरूस्त्या करावयाच्या असतील त्यांनी अर्ज क्रमांक ८ भरावा. विशेष संक्षिप्त पुर्रनिक्षण कार्यकमांतर्गत एखाद्या मतदारासंघातील एखादा मतदार, यादीत दिलेल्या पत्यावर राहात नसेल, तर अशा नावा बद्दल त्याच मतदारसंघातील एखदा मतदार आक्षेप घेऊ शकतो. त्यामध्ये जर तथ्य आढळून आले तर पडताळणी करून संबंधित मतदाराच्या नावाची वगळणी केली जाते. मतदार याद्यांचे अद्यावतीकरण होण्यासाठी अशा अपात्र मतदारांची वगळणीही महत्वाची असते.

*विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम : नव मतदार नोंदणी, दुरूस्ती व वगळणी यासाठी दि.१० व ११ ऑगस्ट २०२४ व दि.१७ व १८ ऑगस्ट २०२४ या दिवशी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम राबविला जाणार असून या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर इडज मतदार यादीसह उपस्थित राहतील.

। पान २ वर

## संपादकीय

### पालक कमी पडतात ..?

मुलांमधील पार संपत चाललेला संवाद किंवा अडनिड्या वयातील विसंवाद हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. तथापि ज्या कुटुंबात असा संवाद असतो त्या कुटुंबातील मुले त्यांच्याही नकळत सुजाण बनतात. याचा अनुभव नुकताच लखनौ पोलिसांना आणि पालकांना आला. त्या घटनेचे वृत्त माध्यमात प्रसिध्द झाले आहे. ते असे, एक मुलगी पाचवीत शिकते. तिचे वडील राजकीय नेते आहेत. शाळा सुटल्यावर तिच्या अपहरणाचा प्रयत्न दुचाकीस्वारांनी केला. 'तुझ्या बाबांनी तुला तातडीने बोलावले आहे. आम्हाला तुला घ्यायला पाठवले आहे', असे त्यांनी तिला सांगितले. तथापि 'अनोळखी यक्तींबरोबर जायचे नाही आणि कोणी काही दिले तर खायचे नाही असे माझ्या आईने मला सांगितले आहे.' असे त्या मुलीने त्या व्यक्तींना सांगितले. ते मुलीला जबरदस्ती करत होते, ते गर्दीचे ठिकाण असल्याने त्यांनी तिथून पळ काढला, मुलगी घरी गेल्यावर वडिलांनी तिला बोलावले नसल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हेच कारण सांगून मुलांचे अपहरण केल्याच्या घटना अधूनमधून घडतात. उपरोक्त घटनेतील मुलीला तिच्या आईने काही गोष्टी शिकवल्या नसत्या तर चित्र कदाचित वेगळे असू शकले असते. मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार करणे हे पालकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी संवाद आत्यंतिक गरजेचा असतो. तो साधण्यासाठी वेळ काढावा लागतो, ज्याची उणीव असल्याचा बहाणा सतत पुढे केला जाताना आढळतो. तथापि संवादाची गरज आणि वेळ वाया कुठे जातो याचे अवलोकन किती पालक करत असतील? संस्कार करण्यात गोष्टी आणि बोधकथा मोलाची भूमिका बजावतात. मोठ्यांचा आदर करणे, सकारात्मक विचार करणे, नम्रता, प्रामाणिकपणा, प्रेम, आपुलकी, साहचर्य, सहनशक्ती किंवा कर्तव्यभावना अशा अनेक गोष्टी सहज मारलेल्या गप्पांमधूनही शिकवल्या जाऊशकतात. त्या मुलीच्या आईने तिला सावधान कसे राहायचे, प्रसंगांचा सामना कसा करायचा हे शिकवले असावे म्हणूनच ती मुलगी धाडसाने तिचे अपहरण टाळू शकली. विसंवादाचे विपरीत परिणाम समाजाच्या अनुभवास येतात. बालगुन्हेगारी वाढत आहे. किरकोळ कारणांसाठी पंधरा-सोळा वर्षांची मुले एकमेकांच्या जीवावर उठतात. शाळेतील त्याच वयाची मुले त्यांच्याच मित्रांवर रॅगिंग करतात. अनेक मुले व्यसनांच्या आहारी जातात. तेव्हा मुलांना संस्कार किंवा वळण नाही, असे सरसकट बोलले जाते. पण ते लावण्यात त्यांचे पालक कमी पडले असू शकतील का?

पान १ वरुन

### १८ वर्षे पूर्ण केलेल्या व मतदार यादीत..

* मतदार यादीः दि.२३ जानेवारी २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण मतदार ३५ लाख ७८ हजार ९७२ इतकी होती, तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४, ३६ लाख ५६ हजार ८३३ इतकी होती. आज दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी सदर मतदार संख्या ही ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून यामध्ये पुरुष- १९ लाख ८ हजार १४६, महिला-१७ लाख ८३ हजार ९६६ व इतर २९७ मतदारांचा समावेश आहे. यामध्ये लोकसभेच्या तुलनेत ३५ हजार ५७६ इतक्या मतदारांची वाढ झालेली आहे.

*मतदान केंद्र संख्याः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये एकूण ३६१७ मतदान केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या ३७२३ झालेली आहे. एकूण ३७२३ मतदान केंद्रापैकी शहरी- ११७७ व ग्रामीण भागामध्ये -२५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे. तरी नागरिकांनी आपली नावे विशेष पुरिक्षण कार्यक्रम दि.६ ऑगस्ट २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत नोंदवून घेण्यात यावीत तसेच तद्नंतर सदर मतदार नोंदणी प्रक्रिया ही निरंतर सुरू राहणार आहे. असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी मतदारांनी- ींशिी.शलळ.सीं.ळप आपली नावे मतदार यादमध्ये शोधणेसाठी लशे.रहरीरीहीर.सीं.ळप संकेतस्थळाचा वापर करावा. मतदार यादीसंदर्भात काही माहिती आवश्यक असलेस अथवा काही दुरूस्ती असलेस संबंधित सहा.मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार कार्यालयाशी संपर्क साधावा.

### चुकीला माफी नाही, विधानसभेच्या

पत्ता कट करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

याच पार्श्वभूमीवर बोलताना आज प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सूचक वक्तव्य करत इशारा दिला आहे. क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले, कोणालाही अभय दिलेलं नाही. ज्यांची कोणाची नाव यामध्ये आयडेंटिफाय झालेली आहेत, त्या कोणालाही अभय दिलेलं नाही. कारण चुकीला माफी नाही, अशी भूमिका काँग्रेसच्या हायकमांडकडून घेण्यात आलेली आहे, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे.

---

मंथन : भूमिपुत्र वाघ.(उमरगा )मो.९१७२९७२४८२

क्रांती म्हटलं की रक्तरंजित क्रांती, हिंसा,उठाव,रक्तपात डोळ्यासमोर येऊन जातो. कारण ऐतिहासिक पुरावे पहिले तर जास्तीत जास्त रक्तरंजितच क्रांत्या झालेल्या दिसतात. वाचण्यात आलेल्या, अभ्यासात आलेल्या ह्याच क्रांत्या आपण पाहत आलेलो आहोत. क्रांती हा शब्द घेऊन व्याख्या करायची झाल्यास, क्रांती म्हणजे बदल होय. इतकी साधी सोपी क्रांतीची व्याख्या करता येईल. क्रांतीचा परीघ तरी काय आहे, ते आपण आज पाहणार आहोत.




क्रांती ही विविध अंगाने होत असते.वैचारिक क्रांती, हरितक्रांती, रक्तरंजित क्रांती, वैज्ञानिक क्रांती, आर्थिक, सामाजिक बदलाची क्रांती. क्रांती म्हणजे जर बदल हा असा अर्थ आपण घेतला तर त्याचा परीघ हा वैश्विक क्रांती पर्यंत पोहोचत असतो. क्रांती ही गरजेतून निर्माण होते.आपण क्रांती म्हणजे बदल होय.ही व्याख्या नजरेसमोर ठेवून विचार केला तर, अनेक देशात मानवी हक्काच्या क्रांत्या झाल्याचे दिसून येते. कोणीतरी कोणावर दडपशाही करतो. मानवी हक्क हिरावून घेतले जातात. म्हणून एक समूह अत्याचार करणाऱ्याच्या विरोधात उभा राहतो. आणि मग वैचारिक किंवा रक्तरंजित क्रांती होऊन जाते.आणि त्यातून जो बदल होतो त्यास क्रांती असे म्हणतात. अशी सत्ता बदलाची परिभाषा दोन स्वतंत्र विचारातून झालेली दिसते. यात एक रक्तरंजित क्रांती तर दुसरी अहिंसक मार्गाने झालेली.खरे तर क्रांती किंवा बदल खूप विविध मार्गाने होत असतात. समूहाची देशाची गरज पाहून ही क्रांती होत असते. आता आपण महत्त्वाच्या झालेल्या क्रांत्या पाहणार आहोत भारताचा विचार केला तर, स्वतंत्र्याच्या साठी झालेली क्रांती. इंग्रजांच्या अन्याय त्याचाराला कंटाळून भारतीयांनी स्वातंत्र्याची क्रांती सुरू केली.ही स्वतंत्र्याची क्रांती म्हणजे एक तर हिंसक मार्गाने क्रांती घडवून आणली आणि दुसरी अहिंसक मार्गाने. दोन्ही क्रांत्यांना तेवढेच महत्त्व जागतिक लेवलवरती आहे. उद्दिष्ट एक प्रवाह मात्र दोन. असे आपणास दिसून येते. महात्मा गांधीजींना वाटायचं की अहिंसक मार्गाने आपण क्रांती करू आणि देश स्वतंत्र करू. तर सुभाषचंद्र बोस आणि इतर तत्सम नेते यांना वाटायचं की क्रांति रक्तरंजित मार्गाने व्हायला पाहिजे.नाहीतर स्वातंत्र्य मिळणार नाही. दोन्ही समान क्रांत्या झाल्या. परंतु अहिंसक मार्गाने यशस्वी झालेली क्रांती ही जगणे - दखल घ्यावी एवढी ही क्रांती सबलतेने यशस्वी झालेली दिसते.ही क्रांती स्वातंत्र्याची होती आणि यशही मिळालं.

बदलाच्या क्रांतीचे काही विषय आपण हाताळणार आहोत.

राजसत्तेची क्रांती :- हा विषय वाचनासारखा आणि चवीचा चर्चा करण्यासारखा आहे. पूर्वी राजे राज्य करायचे. प्रबळ राजा दुर्बल राजाच्या विरोधात जंग छेडायचा. युद्ध करायचा. त्यावेळी हरायचं कोण तर त्या त्या वेळी बचाव आणि योग्य युद्धनीतीचा ज्यांनी विचार आणि नियोजन केलं ते ते विजय झाल्याचे दिसते. कैक हजार पिढ्यामध्ये हा सत्ता संघर्ष आपण जवळून अनुभवला आहे. पाहायला आहे. वाचण्यात आला आहे. जिथे जिथे लोककल्याणकारी राज्य होता ती ती राज्य खूप वर्ष चालल्याची दिसतात.जेव्हा एक राजा प्रजेचं शोषण करतो तेव्हा ती प्रजा राजाच्या विरोधात बंड करते, आणि ते राज्य स्वतः उलटून पाडते. मग दुसरा राजा गादीवर येतो. असे राजसत्तेतील क्रांतीचा इतिहास आपण पाहत आहोत.

हरितक्रांती:-हा विषय मानवी जीवन सुखकर होण्यासाठी झालेली मोठी क्रांती आहे. मानवाच्या गरजा पाहून शेती,पाणी, माती,पिके यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत गेलेले आहेत. जागतिक लोकसंख्येच्या प्रमाणावरती अन्नाची गरज जशी जशी जास्त भासत गेली, तसतसे हरितक्रांती मध्ये बदल झालेले दिसून येतात. जास्त उत्पादन देणाऱ्या बियाणाची निर्मिती करण्यात आली. त्याच्या पद्धती बदलल्या. आंतरपीक घेण्याच्या पद्धती बदलल्या.शेती पाणी आणि पिकांची वर्गवारी करून अभ्यास करून जास्त पिके निर्माण करून देणारी बियाणे विकसित करण्यात आली.यातून हरितक्रांती झाल्याचे दिसून येते.

वैचारिक क्रांती:- हा विषय मानवी बदलासाठी खूप महत्त्वाचा आहे.तो असा आहे की धर्म व्यवस्था, राज्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, न्याय व्यवस्था या वैचारिक झालेल्या बदलाच्या क्रांत्या आहेत. भारतात विचार केला तर भारत देशामध्ये एकेकाळी मनुस्मृतीच्या विचाराने हा देश चालायचा. चातुर्वर्ण्य व्यवस्था या देशात होती. गेल्या चारशे वर्षा दरम्यान सामाजिक बदलासाठी खूप मोठे कार्य झाल्याचे दिसते. छत्रपती शिवराय,छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, यांच्यासारखे अनेक समाजसुधारक यांच्या विचारातून सामाजिक बदलाच्या क्रांती झाल्याचे दिसते.यातून खूप मोठे बदल झाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जगातल्या सर्व संविधानाचा अभ्यास करून भारतातील मानवी मूल्य जतन करणारे संविधान निर्माण केले.

संविधानाच्या आधारावरती लोकशाही निर्माण झाली. लोककल्याणकारी राज्याची सुरुवात झाली. मनुस्मृतीचं दहन केलं. आणि एक मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली.

जगातल्या अनेक संविधानापैकी भारताच्या संविधानास विशेष मान्यता आहे. ज्यात स्वातंत्र्य,समता,बंधुत्व आणि न्याय या मूल्याचा अंतर्भाव असणारे भारताचे संविधान. ही विशेष झालेली वैचारिक क्रांतीच म्हणावी लागेल.

वैज्ञानिक क्रांती:- हा विषय आपण जवळून पाहत आहोत. आज विज्ञानाच्या आधारावरती जगाने खूप मोठी क्रांती केलेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे चंद्र, मंगळ शोधण्यास मानवाला यश प्राप्त झाला आहे. दळणवळणाची साधने याची मोठ्या प्रमाणावरती प्रगती झालेली आहे. विमान, रेल्वे, वीज अशा विविध प्रकारचे तंत्रज्ञान जगामध्ये विकसित झाले. त्यास आपण वैज्ञानिक क्रांती असे म्हणू. तेव्हा मित्रांनो क्रांती ही खूप पैलूंनी होत असते. याकडे सकारात्मक आणि डोळसपणे पाहण्याची गरजेचे आहे. चला तर आपणही मानवी मूल्याचे जतन करणाऱ्या अनेक वैचारिक क्रांतीमध्ये विचाराच्या प्रवाहामध्ये सहभागी होऊ या....

.. जय जगत...

---

## दिवस आपल्यासाठी उगवतोच...

मी सातवीच्या वर्गात असताना माझ्या वर्गात गेल्या सहा वर्षांपासून नापास होणारा एकजण होता.आम्ही त्याला सगळेजण नाना म्हणायचो.तो आमच्याच गल्लीत राहायला होता.आमच्यापेक्षा वयाने खूप मोठा.मिशासुद्धा चांगल्याच वर आलेल्या होत्या.आणि हा नाना अंगाने धिप्पाडच्या धिप्पाड होता.जणू पैलवानच.म्हणजे आमचं मास्तर त्याच्या खांद्याला लागायचं.आणि पोरं त्याच्या गुडघ्याला.अंगाने दणकट असणारा नाना.पण अभ्यासात पार दरिद्री.नानाला काहीच येत नव्हतं.आणि दरवर्षी नाना नापास व्हायचा.

त्यात आमच्या मास्तरने एक नियम असा केला होता,वर्गात विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर जो विद्यार्थी बरोबर देईल त्याने वर्गातल्या सगळ्या पोरांच्या मुस्काडीत मारायची.त्यावेळचे मास्तर असा नियम करायचे.आणि यात काय व्हायचं त्या भितीने सगळी पोरं मन लावून अभ्यास करायची.पण नानाच्या डोक्यात काहीच राहत नव्हतं.आणि त्याचा परिणाम म्हणजे नाना दररोज न चुकता वर्गातल्या प्रत्येकाचा मार खायचा.आणि पोरं पण नानाला मारताना जोरात रट्टा द्यायची.नाना डोळे गच्च मिटून हाताची घडी घालून उभा राहायचा.पोरांनी कधीच नानावर दया माया दाखवली नाही.मला मात्र नानाची फार कीव यायची.कारण नानाला कशाचंच उत्तर यायचं नाही.

तरीही नाना दररोज शाळेत न चुकता यायचा.उलट सर्वांच्या आधी नाना वर्गात हजर असायचा.सकाळी आलेला नाना व्यवस्थित दिसायचा.आणि शाळा सुटल्यावरचा नाना म्हणजे दोन्ही गाल लालभडक सुजलेले आणि डोळे पार रडून रडून खोल गेलेले दिसायचे.एक दिवस शाळा सुटल्यावर मी जवळ जाऊन नानाला विचारलं,म्हणलं नाना कशाला शाळेत येतो?तुला काही येत नाही. रोज पोरं मारतात तुला.तू कुणाला काहीच बोलत नाहीस.मला कळत नाही एवढं सहन करूनसुद्धा तू कधी शाळा चुकवत नाहीस.कशासाठी हे तू करतोस.? त्यावर नानाने माझ्या डोक्यावर हात ठेवून केसातून हळुवार बोटे फिरवली.माझ्याकडे पाहत त्याने डोळे गच्च मिटले.डोक्यावरचा हात काढून घेतला आणि नाना तसाच पाठमोरा होऊन झपझप पावले टाकत निघून गेला.मी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर नानाने दिलं नाही. रोज शाळा भरत राहिली.आणि रोज नाना न चुकता मार खात राहिला.तोंड सुजवून घेत राहिला.मास्तरने प्रश्न विचारला की आपोआप नाना मनानेच उभा राहायचा अगदी तसाच डोळे गच्च मिटून.

आणि मग ज्या पोरानं उत्तर बरोबर दिलेलं असायचं ते उड्या मारत नानाजवळ जायचं आणि खाडकन नानाच्या जोरात मुस्काडीत द्यायचं.पाचही बोटे नानाच्या गालावर जशीच्या तशी उमटायची.एवढ्या धिप्पाड नानाला मारलेल्या आनंदाने ते पोरगं लै उड्या मारायचं.आणि सगळी पोरं नानावर खीखीखीं..दात इच्कुन माकडासारखी हसायची.आणि मी हे सगळं केविलपणे बघत बसायचो.

पण एक दिवस घडलं असं,मास्तरने एक प्रश्न विचारला,तो प्रश्न असा होता.

गावाबाहेर बायका जिथं धुणं धुवायला जातात,त्या जागेला काय म्हणतात.?



आम्ही सगळ्यांनी जमेल तशी उत्तरे दिली, कुणी सांगितलं,ओढा म्हणतात,नदी म्हणतात,बगळ,आड,विहीर,तलाव,तळं, डबकं,पोहरा म्हणतात तर कुणी कुणी खूप डोकं खाजवून काहीही उत्तरे दिली.पण मास्तर उत्तर चुकीचं आहे असंच सांगत होते.नाना शांत बसून सगळीकडे पाहत होता.सगळ्यांची उत्तरे चुकलेली होती.गोंधळ शांत झाला आणि नानाने हात वर केला.जसं नानाने हात वर केला तशी सगळी पोरं एकसाथ मान वळवून नानाकडे बघायला लागली.मास्तर ही नानाकडे एकटक बघतच राहिले.कारण आज पहिल्यांदाच नानाने बोट वर केलेलं होतं.

त्याच शांततेत नाना उभा राहिला.आणि हाताची घडी घालून नानाने मान ताठ करून उत्तर दिलं,

गुरुजी गावाबाहेर बायका ज्या जागेवर धुणं धुतात त्या जागेला पाणवठा म्हणतात.

आणि एका झटक्यात गुरुजी म्हणाले,नाना लेका तुझं उत्तर बरोबर आहे.मास्तर जसं उत्तर बरोबर आहे म्हणाले तसा नानाने मोठा दीर्घ श्वास घेतला.गेल्या सहा वर्षांनंतर आज आज नानाचं उत्तर बरोबर आलेलं होतं.आणि नियमानुसार आज नाना सगळ्यांच्या मुस्काडीत मारणार होता.नानाचा एक हात किमान बारा किलो वजनाचा तरी नक्की असावा. त्यांचं ते रूप बघून वर्गातली सगळी पोरं थरथर कापायला लागली.पळून जाण्यासाठी दफ्तर आवरायला लागली.नानाच्या लक्षात आलं.आणि पटकन दाराकडे धाव घेत वर्गाचं दार लावून दाराची आतली कडी लावली.त्याने कडी लावल्याबरोबर सगळी पोरं मोठ्याने बोंबलायला लागली.कारण नानाचा दणका बसल्यानंतर आयुष्यातून उठणार याची जाणीव प्रत्येकाला झालेली होती. मी शांतपणे नानाकडे पाहत होतो.

मलाही एक त्याची मुस्काडीत बसणार होतीच.पण मनातून मी खूप आनंदी झालो होतो.नानाचा चेहरा लालबुंध झाला होता.त्याचा हात सळसळत होता.डोळे मोठे झाले होते,आणि नाना आता सगळ्या वर्गावर तुटून पडणार होता.मास्तरानीच नियम केलेला असल्यामुळे मास्तर नानाला अडवूच शकत नव्हते.तरीही नानाचा तो राग पाहून मास्तर दबकतच हळूच नानाला म्हणाले,नाना जाऊ दे सोड लेकरं लहान..... मास्तरचं वाक्य पूर्ण झालंच नाही.तोच नानाने अक्षरशः मास्तरला लहान मुलासारखं दोन्ही हाताने उचलून घेतलं आणि अलगद खुर्चीवर नेऊन ठेवलं. मास्तर घाबरून शांत बसले.

त्यानंतर गेल्या जवळजवळ सात वर्षाचा तो अन्याय नानाला आठवला.नानाने वर्गावर नजर फिरवली.त्याला आठवू लागलं.कुणी कुणी कसं हानलेलं आहे.कुणी किती छळलेल आहे हे सगळं नानाने डोक्यात फिट्ट केलेलं होतं.नाना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आग फेकून पाहू लागलेला होता.पोरं हात जोडून ओरडत होती.नव्हे बोंबलत होती.मास्तरला विनवण्या करत होती.पण मास्तरचा नाईलाज होता.

नानाने सुरवात केली.एक एक पोरगं कॉलरला धरून नानाने उभं केलं नाही तर एका हाताने उचलून धरलं.आणि दुसऱ्या हाताने नानाने असं झोडपून काढायला सुरवात केली की बस्स.एका मुस्काडीत पोरगं भिंतीवर जाऊन आदळत होतं.आणि आडवं होऊन पडत होतं.ते बघून बाकीचे सगळे जोरात बोंबलत होते.नाना पेटलेलाच होता.सगळा वर्ग ओला होताना दिसायला लागला.त्याच्या एका रट्ट्याने पोरं चड्डीत मुतून मुतून बोंबलत होती.काही पोरं ते बघूनच मारायच्या आधीच लघवी करत होती.मास्तर हात जोडून वर बघून काहीतरी डोळे झाकून बडबडत होते.नाना कुणाला सुट्टी देत नव्हता. मी कधी नानाला मारलं नव्हतं.म्हणून नानाने माझ्या फक्त गालावर हात फिरवला.सगळ्यांना झोडपून झाल्यावर नाना त्याच्या जागेवर जाऊन बसला.सगळा वर्ग हमसून हमसून रडत होता.आणि नाना त्याच्या फुटलेल्या मिशिवर ताव मारत सगळीकडे बघत बसला होता.

पोरं एकमेकांना सावरत होती. मास्तर टेबलावर मान टाकून गप्प पडून बसलेलं होतं.मी हळूच नानाला चोरून पाहत होतो.त्याच्या चेहऱ्यावर समाधान होतं.त्याचा असा हसरा आणि सुंदर चेहरा आज मी पहिल्यांदा बघत होतो.

शाळा सुटली.रोज दंगा करत धावत पळत जाणारी पोरं जागेवरच बसून राहिली.फक्त नाना उठला आणि माझ्याजवळ आला.

माझ्या हाताला धरून त्याने मला उठवलं.मी त्याच्यासोबत बाहेर आलो.त्याने त्याचं दफ्तर मला दिलं.आणि म्हणाला, राहू दे आता तुलाच दफ्तर,मी शाळा सोडली आजपासून.

उद्यापासून येणार नाही.तू मला विचारलं होतं ना की शाळा का सोडून देत नाहीस? तर यासाठी सोडत नव्हतो.कारण मला माहित होतं.एक ना एक दिवस तरी माझ्या प्रश्नाचं उत्तर बरोबर येईल.एक ना एक दिवस तरी माझ्यासाठी दिवस उगवल.त्या दिवसाची वाट बघत होतो.आणि आज तो दिवस आला. माझ्या नाजूक गालावर त्याने हात फिरवला.आणि नाना शाळेच्या मैदानातून शांतपणे निघून गेला.

दोस्त हो, गोष्ट संपली.पण फार मोठी शिकवण नानाने दिली.जोपर्यंत सहन करायचा काळ असतो तोपर्यंत सहन करत रहा.कारण आपला दिवस येणारच असतो त्या दिवसाची वाट पहात रहा.

**लेखक. नितीन सुभाष चंदनशिवे.**
**मु. कवठेमहांकाळ**
**जि. सांगली. संपर्क – ७०२०९ ०९५२१**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# दुधनी केंद्र शाळ पोडून कॉम्प्युटर प्रिंटर मशीन चोरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी /प्रतिनिधी : मौजे दुधनी तालुका अक्कलकोट येथे एकाच मैदानात जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींची शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलांची शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा असे चार वेगवेगळे शाळा आहे मे महिन्याच्या उन्हाळा सुट्टी पासून आत्ता पर्यंत वेगवेगळे शाळेत वेगवेगळे चोरी होत आहे या चोरीला आळा घालण्यासाठी पालकवर्ग पोलिस प्रशासन व दुधनी गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी लक्ष घालून त्याचा बंदोबस्त होणे गरजेचे आहे सोमवार रोजी मराठी शाळेचे कुलुप तोडून आतील अठरा हजार किमतीचे प्रिंटर पंचेचाळीस हजार किमतीचे लॅपटॉप तर मुलांसाठी शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी असलेले गोडेतेल विठ्ठल या कंपनीचे पंचेचाळीस पॉकेट तेल चोरट्यांनी चोरून नेले यासाठी तरुण युवा पिढी पुढाकार घेऊन तसेच पोलिस प्रशासन यांना सांगून बंदोबस्त करावा अशी सर्व शिक्षक बांधवांचे म्हणणे आहे काही दिवसांपूर्वी पालकांनी दिलेली टिव्ही चोरी झाली गरिबांची मुले येथे शिक्षण घेत असताना त्यांच्या साठी अशा अनेक शैक्षणिक साहित्य वापरून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करत असताना अशा प्रकारे चोरी होते यामुळे सर्व शिक्षक बांधव नाराजी व्यक्त केली याला काय करावे येथील मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रश्न्न पडला आहे. चोरी होत आहे याचं बद्दल काय करावे येथील शिक्षकांना काही कळेना झाले आहे.

## ॲड.सोमनाथ वैद्य यांनी घडविले माणुसकीचे दर्शन

# मोर्चातील हजारो शिक्षकांना दिले पिटलं- भाकरीचे रुचकर भोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : सामजिक कार्य अन् बांधिलकीचा ध्यास घेतलेल्या स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सोमनाथ वैद्य यांनी माणुसकीचे दर्शन घडवत मोर्चातील हजारो शिक्षकांना पिटलं- भाकरीचे रुचकर भोजन दिले. उपस्थित शिक्षकांनी या भोजनाचा आस्वाद घेत ॲड. सोमनाथ वैद्य यांच्या कार्याचे भरभरून कौतुक केले.

सोलापूर जिल्ह्यातील संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आला. यामध्ये सहभागी २७ विविध संघटनांच्या हजारो शिक्षकांच्या मदतीला सामजिक कार्य अन् बांधिलकीचा ध्यास घेतलेल्या स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सोमनाथ वैद्य धावून आले. आंदोलन स्थळी दुपारच्या स्वादिष्ट जेवणाची नेटकी व्यवस्था केली. माणुसकीचे दर्शन घडविले. उपस्थित सुमारे पाच हजारहून अधिक शिक्षकांना गरम भाकरी, धपाटे, पिटलं अन् ठेचा असे रूचकर भोजन मोफत वाटप केले. सहभागी शिक्षकांनी या भोजनाचा आस्वाद घेऊन तृप्तीचा ढेकर दिला.

दरम्यान, मोर्चातील हजारो शिक्षकांना योग्य वेळी योग्य असलेली जेवणाची गरज जागेवरच भागवली. या बद्दल उपस्थिल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

शिक्षक संघटना पदाधिकाऱ्यांनी मानले ॲड. वैद्य यांचे आभार !

स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमेश वैद्य व ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी



यांच्यावतीने मोर्चामध्ये सामील झालेल्या जवळजवळ ५ हजार लोकांना पिटलं - भाकरीचे मोफत वाटप करण्यात आले. त्याबद्दल ऍड.वैद्य यांचे दक्षिण सोलापूर तालुका मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष मुख्याध्यापक सुभाष व्हनमाने यांनी आभार मानले. तसेच या उपक्रमाचे प्राचार्य सुभाष माने यांनी कौतुक केले.

न्याय हक्क आणि लढ्यासाठी सदैव पाठीशी : सोमनाथ वैद्य

संस्था संघटना आणि सामान्य जनतेचे प्रश्न्न सुटले पाहिजे. शिक्षक असोत अथवा सामान्य नागरिक त्यांच्या न्याय हक्क आणि लढण्यासाठी सदैव पाठीशी राहणार आहे. सर्वतोपरी मदत देण्यासाठी सक्रिय सहभाग यापुढेही राहील, अशी भावना स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ड. सोमनाथ वैद्य यांनी व्यक्त केली.

# अक्कलकोट भिमनगर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या आमदार निधीतून सिमेंट कॉंक्रीट रस्ता व बंदीस्त गटार कामाला सुरुवात




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या आमदार निधीमधून रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या विशेष प्रयत्नाने अक्कलकोट नगरपरिषद प्रभाग क्रमांक ७ मधील भिमनगरमध्ये अंतर्गत सिमेंट कॉंक्रेट रस्ते व बंदिस्त गटार कामाच्या ४० लाख रुपये कामाची सुरुवात भिमनगर पंचकमीटी सदस्य दत्ता मामा मडिखांबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी रिपाइंचे शहर अध्यक्ष अजय मुकणार, शिव बसव फुले शाहू आंबेडकर सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप मडिखांबे,प्रा राहुल रुही, शुभम मडिखांबे,विजयकुमार मडिखांबे, आकाश मडिखांबे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अविनाश मडिखांबे म्हणाले की भिमनगर येथे पिण्याच्या पाण्याचे अंतर्गत पाईपलाईनचे काम करीत असताना सदर रस्ता खोदकाम केल्याने सर्वत्र ऐन पावसाळ्यात सगळीकडे खड्डे पडून पाणी साचल्याने अनेक रोगराई उद्भवून अनेक नागरिक आजारी पडल्याने सदरची बाब आमदार कल्याणशेट्टी यांच्या कानावर घातली असता त्यांनी त्वरीत आमची मागणी मान्य करुन भिमनगर वासीयांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

# स्वेरीच्या तीन विद्यार्थिनींची 'पर्सिस्टंट सिस्टम्स'या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'पर्सिस्टंट सिस्टम्स' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागातील निकिता पोरे, नुपूर पवार व प्रज्ञा रेपाळ या तीन विद्यार्थिनींची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'पर्सिस्टंट सिस्टम्स'या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागातील निकिता ज्ञानेश्र्वर पोरे, नुपूर निलेश पवार व प्रज्ञा अनिल रेपाळ या तीन विद्यार्थिनींची निवड केली असून त्यांना प्रत्येकी वार्षिक रु. ५.०१ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. 'पर्सिस्टंट सिस्टम्स' ही कंपनी ३४ वर्षे जुनी असून १९९० साली स्थापन




झाली आहे. या कंपनीमध्ये २३ हजाराहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. ही कंपनी प्रामुख्याने क्लाऊड, इंटरनेट ऑफ थिंग्ज, बिग डेटा आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग या क्षेत्रात कार्यरत आहे. आनंद देशपांडे हे या कंपनीचे संस्थापक आहेत. अशा नामवंत कंपनीत स्वेरीचे विद्यार्थी रुजू होतात, हे देखील विशेष महत्वाचे आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, अभियांत्रिकी पदवीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून 'पर्सिस्टंट सिस्टम्स' या कंपनीत निवड झालेल्या निकिता पोरे, नुपूर पवार व प्रज्ञा रेपाळ यांचे अभिनंदन केले.

## ५०० स्थलांतरीत रहिवाश्यांना दिवसातून ३ वेळा फुड पॅकेट.

# पंढरपूर येथील पुरग्रस्तांना मंदिर समितीच्या मार्फत 'फुड पॅकेट : गहिनीनाथ महाराज औसेकर




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः उजनी व वीर धरणातील विसर्गामुळे चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने पंढरपूर शहरातील नदीकाठच्या काही रहिवाश्यांना सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत केले आहे. स्थलांतरित रहिवाशांना मंदिर समिती मार्फत फुड पॅकेटची उपलब्धता करून देण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.मंदिर समितीने सामाजिक उत्तरदायित्व व मानवतावादी भूमिकेतून तसेच स्थानिक प्रशासनाने विनंती केल्याने पंढरपूर शहरातील सुमारे ५०० स्थलांतरीत रहिवाश्यांना सकाळी नाष्टा, दुपारी जेवण व रात्री जेवण असे ३ वेळा फुड पॅकेट वाटप करण्यास सुरवात करण्यात आली आहे. त्याचा शुभारंभ आज दिनांक ०६ ऑगस्ट रोजी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे व ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख (जळगांवकर) यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विभाग प्रमुख राजेश पिटले, सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी उपस्थित होते. सदरचे फुड पॅकेट मंदिर समितीच्या संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये तयार करून वाटप करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले स्वरूप भरत भुजबळ यांचा इंदापूर महाविद्यालयामध्ये सत्कार

## माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व युवा नेते राजवर्धन पाटील यांनी स्वरूप भुजबळ यांना दिल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे आणि उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमधून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले स्वरूप भरत भुजबळ यांचा महाविद्यालयाच्या शाहीर अमर शेख सभागृहामध्ये सत्कार करण्यात आला. स्वरूप भुजबळ हे वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांचे चिरंजीव आहेत. पोलीस उपनिरीक्षक स्वरूप भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना आपले अनुभव सांगितले आणि विद्यार्थ्यांना ध्येयपूर्तीसाठीचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ११ वी, १२ वी पासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करावी.योग्य प्रयत्नाने आपल्याला हे यश संपादन करता येते असे मत पोलीस उपनिरीक्षक स्वरूप भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे , डॉ.भरत भुजबळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील सावंत यांनी केले. यावेळी क्रीडा शिक्षक प्रा. बापू घोगरे आणि सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिदास भांगे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. राजीव शिरसट यांनी मानले.

# स्टार प्रवाहच्या थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतल्या गायत्री प्रभूच्या लूकला प्रेक्षकांची मिळतेय पसंती

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मालिका आणि प्रेक्षकवर्ग यांचं जिव्हाळ्याचं नातं असतं. मालिकेतली पात्र नकळतपणे आपल्या कुटुंबाचा भाग होऊन जातात. मालिकेची गोष्ट, ही गोष्ट पडद्यावर रंगवणारे कलाकार यासोबतच कलाकारांचे हटके लूक हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. स्टार प्रवाहच्या थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतल्या गायत्री प्रभूच्या लूकलाही प्रेक्षकांची पसंती मिळतेय. गायत्री प्रभू... अतिशय हुशार आणि स्वावलंबी आहे. फिनिशिंग कॉलेजची टॉपर आणि सध्या एका मोठ्या तारांकित हॉटेलमध्ये मॅनेजरचं काम सांभाळतेय. वर्किंग वुमन असल्यामुळे मानसीचा लूक डिझाईन करताना फॉर्मल लूकवर शिक्कामोर्तब करण्यात आलं. अभिनेत्री, नृत्यांगना आणि वेशभुषाकार अशी बहुरंगी ओळख असलेल्या शाल्मली टोळ्येने गायत्रीचा लूक डिझाईन केला आहे. कॉटनच्या साड्या, ट्रेंडिंग ब्लाऊज आणि ऑक्सिडाईज ज्वेलरी असा परफेक्ट फॉर्मल लूक करण्याचं शाल्मलीने ठरवलं. गायत्रीच्या सौंदर्याने हा लूक आणखीनच खुलून आलाय.गायत्री प्रभूची भूमिका साकारणारी अभिनेत्री मानसी कुलकर्णी तब्बल १० वर्षांनंतर मालिका विश्र्वात पदार्पण करतेय. गायत्रीच्या भूमिकेला आणि तिच्या लूकला मिळणाऱ्या भरभरुन प्रतिसादाविषयी सांगताना मानसी म्हणाली, 'मला साडी नेसायला खूप आवडतं. गायत्रीच्या लूकसाठी डिझाईन केलेल्या साड्या फारच सुरेख आहेत. प्रेक्षकांकडून या लूकचं खूप कौतुक होतंय. मला स्वत:ला हा लूक खूप आवडलाय. गायत्रीचा लूक परिधान केल्यावर एक वेगळाच आत्मविश्र्वास जाणवतो. तेव्हा पाहायला विसरु नका थोडं तुझं आणि थोडं माझं रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.'

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८



## रिद्धपूर येथील मराठी विद्यापीठाच्या कामाला गती द्यावी : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथील मराठी विद्यापीठाच्या कामाचे कालबद्ध नियोजन करून या कामाला अधिक प्राधान्य देऊन गती द्यावी, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मराठी विद्यापीठ सद्यस्थितीसंदर्भात सादरीकरण करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी,सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.बैठकीत मुख्य प्रशासकीय इमारत, कुलगुरू दालन, निबंधक दालन, आस्थापना बैठक व्यवस्था, थीमपार्क, विद्यार्थी बैठक व्यवस्था, ध्यानकेंद्र, स्वागतकक्ष, वाचनालय, मुले व मुलींकरिता स्वतंत्र वसतिगृहाची निर्मिती, मोठे बहुउद्देशीय सभागृह आणि विद्यापीठ सुरू करण्यासाठी, कुलगुरुंची निवड, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा तसेच आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी अधिक गती द्यावी, असे निर्देशही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी दिले.



## निफाड येथे १० ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय लाठी अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी आणि प्रशिक्षण वर्ग

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा लाठी असोसिएशन नाशिक व लाठी असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी जिल्हा स्तरीय अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी व प्रशिक्षण वर्ग नाशिक येथील निफाड तालुका येथील सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न होत आहे या राज्य स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्याचा संघ सहभागी होत आहे. या साठी १० ऑगस्ट (शनिवार) रोजी सकाळी १० वाजता . ८ वर्ष ,१० वर्ष, १२ वर्षे, १४ वर्ष , १६वर्ष, १८ वर्ष व सीनियर गट लाठी खेळाडूंनी आपल्या किटसह उपस्थित राहावे या स्पर्धेसाठी जन्म पुराव्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विहित नमुन्यामध्ये इंग्रजी व मराठी मध्ये असलेल्या जन्मतारखेची नोंद असलेले प्रमाणपत्र, आधार कार्ड, ग्रामपंचायत किंवा नगरपालिका जन्म प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. कृपया याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी या चाचणी स्पर्धेसाठी अधिक माहिती साठी विलास गायकवाड यांच्या कडे संपर्क करणे या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलालजी चोरडिया ,मुख्याध्यापिका ज्योती बागडे ,तसेच लाठी इंडिया ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष गुरू अजय आर शहा राष्ट्रीय निर्णायक सुधीर कांबळे , प्रतीक्षा कोटकर ,रमेश वडघुले, उपस्थित राहणार आहे या स्पर्धेत खेळाडूनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन नाशिक जिल्हा लाठी असोसिएशन चे सचिव विलास गायकवाड (९९२११३३३०३) यांनी केले आहे

## नळदुर्ग येथील शिवम् कॉम्प्युटर एज्युकेशनच्या वतीने डॉ.सुभाष राठोड यांचा सत्कार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग तर्फे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,नळदुर्ग येथील प्राचार्य डॉ. सुभाष राठोड प्राचार्य पदी नियुक्ती झाल्यानंतर शिवम् कॉम्प्युटर एज्युकेशन सरकार मान्य सारथी नावाचा एक उपक्रम राबविला जातो त्या वेळेस त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्यामध्ये मराठा समाजातील युवांना वीस ते पंचवीस हजाराचे कॉम्प्युटर डिप्लोमा कोर्स अगदी मोफत आहेत. त्या कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वाटपाचा कोर्स चालू करत असताना त्या विद्यार्थ्यांकडून दोन हजार अनामत रक्कम जमा करण्यात आली होती ती रक्कम परत करण्यात आली .कार्यक्रमास उपस्थित सर्व पाहुण्यांचं स्वागत शिवम कॉम्पुटर चे मुख्य प्रवर्तक सतीश पुदाले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. सानिका संतोष महाबोले हिने केले.या कार्यक्रमाला शशिकांत पुदाले , सुभाष राठोड , काही विद्यार्थ्यांचे पालक मल्लिकार्जुन गायकवाड, अवधूत चव्हाण हेही उपस्थीत होते.या सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती डॉ. सुभाष राठोड यांचे शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कू. बेले अदिती भागवत,गायकवाड तृप्ती मल्लिकार्जून,चव्हाण आकांक्षा अवधुत ह्या विद्यार्थीनींचे प्रमाणपत्र व त्यांनी दिलेली अनामत रक्कम ही परत करण्यात आली तसेच कू. गायकवाड शुभांगी भास्कर, जाधव सोनाली रमेश, मोटे संगिता, कदम तन्वी लक्ष्मण ह्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देण्यात आले.सारथी व कॉम्प्युटर संदर्भात विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन शिवम कॉम्प्यूटर चे मुख्य प्रवर्तक सतीश पूदाले यानी केले. डॉ. सुभाष राठोड यानी आपल्या सत्काराला उत्तर दिले शेवटी आभार पूनम जयसिंग बिसेनी यांनी केले.या कार्यक्रमास पालक विद्यार्थी सहशिक्षक आदीजन मोठ्या संख्येने उपस्थित होते



## राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वरील खड्डे १५ ऑगस्टपर्यंत न बुजविल्यास गुन्हे दाखल करणार : ना.शंभूराज देसाई



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सातारा : सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर खड्डे पडले आहेत. यामुळे अपघाताची शक्यता आहे. येत्या १५ ऑगस्टपर्यंत सर्व खड्डे बुजविण्याचे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या संदर्भात झालेल्या बैठकीत पालकमंत्री श्री. देसाई बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने येत्या १५ऑगस्टपर्यंत खड्डे न बुजविल्यास गुन्हे दाखल करणार, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेल्या रस्त्यांवरील खड्डेही बुजवावेत. कुठेही अपघात होणार नाही, यासाठी रस्ता सुस्थितीत आणावा. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वाहतूक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घ्यावी, अशा सूचनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी बैठकीत केल्या.

**'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचे जिल्ह्यात चांगले काम**

सातारा : 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत ५ लाख २० हजार ५६० ऑनलाईन अर्ज भरले गेले आहेत. त्यापैकी ४ लाख ४२ हजार ८८७ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे. सातारा जिल्ह्याने या योजनेत चांगले काम केले आहे, असे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समिर शेख, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तालुकास्तरावर गठीत केलैल्या समितीची बैठक घेऊन अर्जांना मंजुरी द्यावी. ज्या तालुक्यांची बैठक अद्याप झाली नाही त्यांनी ती त्वरित आयोजित करावी. 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत पात्र महिलांना मोठ्या प्रमाणात निधीचे वाटप करुन महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर राहूया. या योजनेसंदर्भात जिल्ह्यात मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करु, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

**महसूल पंधरवड्यात नागरिकांना योजनांचा लाभ द्यावा**

महसूल पंधरवड्यानिमित्त प्रशासन सर्वसामान्यापर्यंत पोहचवत नागरिकांना शासनाच्या योजनेचा लाभ द्यावा, असे आवाहन श्री. देसाई यांनी केले. महसूल पंधरवड्यात शेतकऱ्यांविषयी राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष सहभाग घ्यावा. दिव्यांगांसाठी असणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन त्यांना प्रत्यक्ष लाभ द्यावा. यासाठी तालुकास्तरीय यंत्रणांना सूचना द्याव्यात, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचाही आढावा घेतला.

**पाटण ते कोयनानगर रस्त्याचे काम १५ दिवसात सुरु करा**

सातारा : पाटण ते कोयनानगर या १३ कि.मी रस्त्याचे काम प्रलंबित आहे. या रस्त्यांवर अनेक खड्डे पडले आहेत. खड्डे बुजविण्याबरोबर रस्त्यांचे काम १५ दिवसात सुरु करा, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात पाटण ते कोयनानगर रस्त्यांच्या कामासंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री श्री. देसाई बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समिर शेख, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, राष्ट्रीय महामार्गाचे अधीक्षक अभियंता दयानंद विभुते, कार्यकारी अभियंता श्रुती नाईक आदी उपस्थित होते.पाटण ते कोयनानगर रस्त्यांवरील पडलेले खड्डे तात्काळ बुजवावेत, अशा सूचना करुन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, हे खड्डे बुजविण्यासाठी जास्तीचा मनुष्यबळाचा वापर करावा. बुजविलेले खड्डे पावसामुळे पुन्हा उखडणार नाहीत, याची दक्षता घ्या.

पाटण ते कोयनानगर १३ कि.मी कामासाठी ८२ कोटी ८२ लाख निधी मंजूर असून हे काम ऑल ग्रेस डेव्हलपर प्रा.लि. कंपनी करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. यावेळी पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या कंपनीने रस्त्याच्या कामासाठी लागणारी यंत्रसामुग्री लवकरात लवकर आणावी. हे काम १५ दिवसात सुरु करावे. काम करीत असताना त्याचा दर्जाही चांगला ठेवावा, अशा सूचनाही त्यांनी बैठकीत केल्या.

## इंदापूर तहसिल कार्यालयात पुरवठा विभागात दलालांचा सुळसुळाट.. कर्मचारी मालामाल ..

### लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ जगताप आंदोलन करणार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळेः इंदापूर तहसिल कार्यालय (पुरवठा विभाग) येथील पुरवठा निरीक्षक यांच्या कृपाआशिर्वादाने कार्यरत झिरो कर्मचारी तथा उमेदवार यांच्यावर कारवाई करून त्यांची हकालपट्टी करण्यात यावी या संदर्भात आज लहुजी शक्ती संघटनेचे वतीने इंदापूर तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

इंदापूर तहसिल कार्यालयामधील पुरवठा विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग असून तालुक्यातील नागरिक पुरवठा विभागांमध्ये नवीन, जीर्ण, गहाळ, स्थलांतरित, शिधापत्रिका घेणे. शिधापत्रिकेतील नाव कमी करणे, वाढवणे, मयताचे नाव कमी करणे, याकरता सातत्याने पुरवठा शाखा इंदापूर येथे येत असतात.

सध्याच्या परिस्थितीमध्ये शिधापत्रिका ऑनलाईन झालेल्या आहेत. सदर शिधापत्रिका ऑनलाईन करत असताना त्यामध्ये असंख्य अशा चुका व त्रुटी सदर शिधापत्रिका ऑनलाईन करणाऱ्यांनी केलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्तापाला तोंड द्यावे लागत आहे. तसेच शिधापत्रिकेतील नाव कमी करणे, नाव वाढवणे अथवा शिधापत्रिकेला मंजुरी घेणे हे सर्व प्रकार ऑनलाईन कमांड द्वारे असल्याने व त्या ठिकाणी काम करत असलेल्या उमेदवार तथा झिरो कर्मचाऱ्यांच्या हातामध्ये असल्याने सदरचे झिरो कर्मचारी हे नागरिकांची आर्थिक पिळवणूक करत आहेत.

तसेच अव्वाच्या सव्वा रकमा घेऊनही मंजुरी देण्यास टाळाटाळ करत आहेत. परंतु काही दलाल व रेशन दुकानदार यांच्या माध्यमातून मोठमोठ्या रक्कम स्वीकारून त्याची कामे विनासायास व तातडीने करून देत आहेत.

यामुळे तालुक्यातील गोरगरीब दीनदलित, विधवा, निराधार, वयोवृद्ध महिला नागरिकांवर प्रचंड अन्याय होत आहे. सदरचे झिरो कर्मचारी हे अत्यंत उर्मटपणे नागरिकांची वर्तन करून त्यांची आर्थिक आणि मानसिक पिळवणूक करत आहेत.शिधापत्रिकेबाबत काम करण्याचे कोणतेही नियोजन नाही. जो जास्त पैसे देईल त्याचे काम तातडीने केले जाते यासारखे दुर्दैव नाही. म्हणून पुरवठा शाखा इंदापूर येथील झिरो कर्मचारी तथा उमेदवार यांची कसून चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. व पुरवठा शाखेतील त्यांना सामील असलेले पुरवठा निरीक्षक यांना पुरवठा शाखेच्या दरवाजासमोर बसून नागरिकांचा झिरो कर्मचाऱ्यांची संपर्क बंद करण्यात यावा. (इंदापूर तहसिलच्या अभिलेख कक्षामध्ये जी व्यवस्था करण्यात आली आहे.) त्याप्रमाणेच व्यवस्था पुरवठा शाखेमध्ये करण्यात यावी. अन्यथा या समस्येकडे शासनाचे गंभीरपणे लक्ष वेधण्यासाठी नाईलाज असतो संघटनेच्या वतीने आंदोलन केले जाईल असे पुणे जिल्हा लहुजी शक्ती सेना संघटनेचे अध्यक्ष दत्ताभाऊ जगताप यांनी सांगितले.

## टाकळीवाडी येथील जागृत देवस्थान श्री यल्लमा देवीची श्रावण महिन्यातील यात्रा प्रारंभ

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील ग्रामदैवत जागृत देवस्थान श्री यल्लमा देवीची श्रावण महिन्यातील यात्रेला सुरुवात झाली आहे.

श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अनेक भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी देवी असा उल्लेख आहे. भाविक भक्तांची अशी श्रद्धा आहे.

पंचक्रोशीतील एक जागृत देवस्थान आहे. फार मोठे शक्तिपीठ आहे. लांब लांबून अनेक भक्त लोक दर्शनासाठी येत असतात. लहान बालकापासून ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत दर्शनासाठी रांग लागलेली असते. श्रावण महिन्यातील शेवटच्या मंगळवारी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. देवळाचे पुजारी आप्पासो बस्तवाडे व शितल बस्तवाडे हे आहेत.

## हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथे १६ ऑगस्टला नोकरी महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**





इंदापूर/अतुल सोनकांबळे : ाष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन (भाऊ ) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिजाऊ इंदापूर तालुका फेडरेशनच्या वतीने भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन इंदापूर येथे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि. १६) सकाळी ९ ते सायं. ४ या वेळेत करण्यात आले आहे, अशी माहिती पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे यांनी इंदापूर येथे दिली.

रोजगार निर्मितीसाठी कुशल व रोजगार क्षम युवकांसाठी नोकरी महोत्सव संधी असून, युवक वर्गाने या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहनही अंकिता पाटील ठाकरे यांनी यावेळी केले. तसेच नोकरीपूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबीरे खालील ३ ठिकाणी आयोजित करण्यात आले आहेत. * भिगवण : सोमवार दि.१२ ऑगस्ट स.१० ते दु.१, स्थळ :- कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भिगवण. * बावडा : मंगळवार दि.१३ ऑगस्ट स.१० ते दु.१, स्थळ:- श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा इंदापूर : बुधवार दि.१४ ऑगस्ट स.१०ते दु.१, स्थळ :-कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर. तरी इच्छुक युवकांनी बायोडाटा व सर्व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन अंकिता पाटील ठाकरे यांनी केली आहे.